जिल्हा/उपविभाग स्तरावरील तक्रार निवारण समिती बरखास्त करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. भ्रनिस-१८२५/प्र.क्र.७०/विचौ-२ (११-अ)**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दि. ५ मार्च,२०२६**

**वाचा:-**१) शासन परिपत्रक, राजनैतिक व सेवा विभाग, क्र:सीडीआर-२०५७, दि.०३.०७.१९५७
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र: सीडीआर-२०७५/अकरा, दि.१३.११.१९७५
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र: सीडीआर-२०७६/६५२३/२०१-B/XI, दि.०४.०४.१९७७
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र: सीडीआर-२०८२/३१८८/६६/११, दि.१४.०२.१९८६
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र:कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८, दि.०९.०४.२०२५
६) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने केलेल्या शिफारशी दि.०९.०७.२०२५
७) शासन परिपत्रक क्र. भ्रनिस-१८२५/प्र.क्र.७०/विचौ-२ (११-अ), दि.१९.११.२०२५

## परिपत्रक

संदर्भ क्र.१ ते ४ येथील शासन आदेशांन्वये जिल्हा आणि तालुका पातळीवरील तक्रार निवारण समितीसंदर्भात, तसेच जिल्हा आणि तालुका पातळीवरील तक्रार निवारण समितीतील अशासकीय सदस्यांच्या नेमणूकीबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. जिल्हा व तालुक्यातील विविध विभागांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांबाबत नागरीकांना असलेल्या तक्रारींचा निपटारा करणे हा या समितीचा उद्देश होता.

२. संदर्भ क्र.५ येथील निर्णयान्वये "महसूल प्रशासनाच्या अध्यक्षतेखाली गठीत विविध समित्यांचा आढावा घेऊन सुसुत्रीकरण करणे" या विषयाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने संदर्भ क्र.६ नुसार आपल्या शिफारशी सादर केल्या आहेत. समितीच्या शिफारशीनुसार संदर्भ क्र.७ येथील परिपत्रकान्वये **तालुका तक्रार निवारण समिती बरखास्त करण्यात आली आहे.**

३. नागरीकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी तालुकास्तरीय लोकशाही दिनाची व्यवस्था कार्यरत आहे. तालुकास्तरीय समितीतील सर्वच सदस्य कार्यालय प्रमुख असून, लोकशाही दिनी सर्वच कार्यालय प्रमुख उपस्थित असतात. तसेच सद्यस्थितीत आपले सरकार, पी जी पोर्टल सारख्या विविध तक्रार निवारण प्रणाली उपलब्ध असताना, उपविभागीय स्तरावरील सदर समितीची आवश्यकता दिसून येत नसल्यामुळे उपविभाग स्तरावरील कालबाह्य तक्रार निवारण समिती रद्द करण्याची शिफारस समितीने केली आहे.

४. समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येत असून, सद्यस्थितीत **जिल्हा/उपविभाग स्तरावरील तक्रार निवारण समिती बरखास्त करण्यात येत आहे.**

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०३०५१२४६५७९१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2026.03.05 12:48:20 +05'30'

**(सुचिता महाडिक)**

**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री (न.वि.वि.) यांचे सचिव,
४) मा.उपमुख्यमंत्री (क्रिडा व उत्पादन शुल्क) यांचे सचिव,
५) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
६) सर्व मा. विधानमंडळ सदस्य
७) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
११) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१२) सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१३) सर्व विभागीय आयुक्त
१४) सर्व जिल्हाधिकारी/सर्व उप विभागीय अधिकारी/सर्व तहसिलदार
१५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६) सर्व पोलीस अधीक्षक
१७) सर्व मंत्रालयीन विभाग
१८) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख
१९) निवडनस्ती.